# करंजगव्हाण येथे कृषी शेतकरी मेळावा उत्साहात

---

पुण्य नगरी

## करंजगव्हाण येथे शेतकरी मेळावा उत्साहात



**मालेगाव :** तालुक्यातील करंजगव्हाण येथे कृषी विज्ञान संकुलामार्फत शेतकरी मेळावा उत्साहात संपन्न झाला. यावेळी तालुक्यातील काष्टी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषी विज्ञान संकुलाचे कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयामार्फत कृषी कार्यानुभव कार्यक्रम घेण्यात आला. मंगळवार (दि.३० जुलै) रोजी हा मेळावा करंजगव्हाण येथे उत्साहात झाला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी करजंगव्हाणचे उपसरपंच सुदाम जाधव उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एस.पी. सोनवणे उपस्थित होते. या मेळाव्याप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ.एस.डी. पाटील यांनी जैविक कीटकनाशकांची उपयुक्तता, डॉ. पवन चौधरी यांनी कांदा पिकाची लागवड व त्याचे व्यवस्थापन, डॉ. सूरज गडाख यांनी कांद्याचे बिजोत्पादन व फायदे तर प्रा. विशाल यादव यांनी कांदा काढणी पश्चात व्यवस्थापन व डॉ. प्रकाश तापकीर यांनी जमीन आरोग्य व्यवस्थापन आदींबाबत मार्गदर्शन केले.

करंजगव्हाण, दहिदीसह आदी गावातील शेतकरी याप्रसंगी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात जैविक कीटकनाशकाचे डॉ. एस.पी. सोनवणे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ.एस.एस. खांदवे, डॉ.पी.आर. पाटील, डॉ.जी.ए. कचवे, ईश्वर चौधरी, वेदांत थोरात, दिनेश पाटील, हर्ष रंभेकर, शुभम बोरसे, सचिन खाडगीर, सुनिल बागुल, मनोज कुडाळे, विश्वजीत पाटील, गणेश कुंभार, वैभव पवार, निखिल काळस्कर, संग्राम सातकर, गौरव सोंजे आदींसह शेतकरी उपस्थित होते.